# महाराष्ट्र शासन
## अल्पसंख्याक विकास विभाग

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, ॲनेक्स ७ वा मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
Website: http//:www.maharashtra.gov.in

**अल्पसंख्याक लोकसमुहातील (मुस्लीम, बौद्ध, जैन, ख्रिश्चन, शीख, पारसी व ज्यू) विद्यार्थ्यांकरिता मौलाना आझाद मोफत शिकवणी व संबद्ध योजना अंतर्गत विविध स्पर्धा परिक्षांच्या पूर्व तयारीसाठी नि:शुल्क अनिवासी प्रशिक्षणासाठी जाहीर सूचना.**

सन-२०१८-१९ मध्ये अल्पसंख्याक लोकसमुहातील (मुस्लीम, बौद्ध, जैन, ख्रिश्चन, शीख, पारसी व ज्यू) विद्यार्थ्यांना मौलाना आझाद मोफत शिकवणी व संबद्ध योजनेअंतर्गत केंद्रीय लोकसेवा आयोग नागरी सेवा परिक्षा, राज्य लोकसेवा आयोग स्पर्धा परिक्षा (राजपत्रित अधिकारी संवर्ग व अराजपत्रित कर्मचारी संवर्ग, बँकींग सेवा परिक्षा, सी.ई.टी., इयत्ता १० वी व इयत्ता १२ अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी विशेष शिकवणी वर्ग इत्यादी परिक्षांच्या पूर्वतयारीसाठी नि:शुल्क अनिवासी प्रशिक्षण राज्यातील मुंबई, ठाणे, पुणे,नाशिक, अमरावती व नागपूर या सहा शहरामधील प्रशिक्षण केंद्रांमध्ये खाजगी प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून देण्यात येणार आहे. प्रशिक्षण केंद्रे व त्यांच्याशी संबंधित जिल्हे खालीलप्रमाणे आहेत.

| प्रशिक्षण केंद्र | संबंधित जिल्हे |
|---|---|
| मुंबई | मुंबई (शहर) आणि मुंबई (उपनगर) |
| ठाणे | ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग |
| पुणे | पुणे,सोलापूर,कोल्हापूर,सातारा,सांगली |
| नाशिक | नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगाव, अहमदनगर |
| अमरावती | अमरावती,अकोला,वाशिम,यवतमाळ,बुलढाणा |
| नागपूर | नागपूर,भंडारा, गोंदिया, चंद्रपूर,गडचिरोली,वर्धा |

इच्छुक व पात्र उमेदवारांनी सोबत जोडलेल्या अर्जाच्या नमुन्यात (प्रपत्र-१) प्रशिक्षण केंद्रांचे (मुंबई,ठाणे, पुणे, नाशिक, अमरावती, नागपूर) संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयात परिपूर्ण भरलेला अर्ज संबंधित कागदत्रासह दि.१६.७.२०१८ पर्यंत सादर करावा.

**प्रशिक्षणाच्या अटी व शर्ती :**

१) उमेदवार हा अल्पसंख्याक लोकसमुहातील (मुस्लीम, बौद्ध, जैन, ख्रिश्चन, शीख, पारसी व ज्यू) असावा.

२) उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

३) विहित नमुन्यामध्ये आवश्यक कागदपत्रासह अर्ज दाखल केलेल्या पात्र उमेदवारांची गुणानुक्रमे प्रशिक्षणासाठी निवड करण्यात येईल.

४) सदर प्रशिक्षण कार्यक्रम एकूण ६ प्रशिक्षण केंद्रामध्ये राबविण्यात येणार असून त्याबाबत सर्व जिल्ह्याच्या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे. तरी त्या-त्या जिल्हयातील जाहिरातीनुसार अर्ज करु शकतील.

५) निवड केलेल्या प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षणादरम्यान निवासाची व भोजनाची व्यवस्था स्वत: करावी लागेल.

**अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :**

१) उमेदवाराचा एक पासपोर्ट आकाराचा फोटो.

२) शैक्षणिक अर्हता, आधार कार्ड,शाळा सोडल्याचा दाखला, धार्मिक संस्था/ धर्म प्रमुख यांनी दिलेले प्रमाणपत्र,तसेच कौटुंबिक उत्पन्नाचा दाखला इ. कागदपत्राच्या प्रती

दिनांक : ०२ जुलै, २०१८

ठिकाण : मुंबई.

उप सचिव

अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन.

## प्रपत्र-१

## मौलाना आझाद मोफत शिकवणी व संबद्ध योजनेअंतर्गत प्रशिक्षणासाठी प्रवेश घेण्याकरीता विहीत नमुना अर्ज

| | | |
|---|---|---|
| १ | प्रशिक्षणाचे नाव | |
| २ | उमेदवाराचे संपूर्ण नाव (आधार कार्ड नुसार) | |
| ३ | लिंग (स्त्री/ पुरुष ) | |
| ४ | जन्मतारीख | |
| ५ | धर्म | |
| ६ | आधार कार्ड क्रमांक | |
| ७ | पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता | |
| ८ | कायमचा पत्ता | |
| ९ | दूरध्वनी /मोबाईल क्रमांक | |
| १० | ई-मेल आयडी (असल्यास) | |
| ११ | कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न | |
| १२ | शैक्षणिक अर्हता तसेच परिक्षेतील गुणांची टक्केवारी | |

अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे--

१. दोन पासपोर्ट आकाराचे फोटो

२. शैक्षणिक अर्हता, आधार कार्ड,शाळा सोडल्याचा दाखला, धार्मिक संस्था/ धर्म प्रमुख यांनी दिलेले प्रमाणपत्र, कौटुंबिक उत्पन्नाचा दाखला इ० कागदपत्राच्या प्रती

ठिकाण--

दिनांक--

उमेदवाराची स्वाक्षरी.